**ठळक बातम्या**

- भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती संयुक्त राष्ट्रसंघाच्या मुख्यालयात साजरी

- अमेरिका आणि इराण दरम्यान तेहरान अणू प्रकल्पाबाबतच्या चर्चेची दुसरी फेरी शनिवारी रोममध्ये होण्याची शक्यता

- यंदाच्या अमरनाथ यात्रेसाठी आजपासून नोंदणी सुरु

- भारतातून हज यात्रेला जाणाऱ्यांच्या  कोट्यात वाढ

**आणि**

- डिजिटल अटक प्रकरणी चार जण सीबीआयच्या ताब्यात

**<><><><><>**

'आपल्या आधुनिक प्रजासत्ताकाच्या बांधणीसाठी डॉ आंबेडकरांनी आपलं आयुष्य वेचलं होतं', असं भारताचे संयुक्त राष्ट्रसंघातले स्थायी प्रतिनिधी पर्वतनेनी हरीश यांनी म्हटलं आहे. अमेरिकेत संयुक्त राष्ट्रसंघाच्या न्यू यॉर्क इथल्या कार्यालयात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले आणि इतर मान्यवरांनी आपले विचार मांडले.

दरम्यान, १४ एप्रिल २०२५ चा दिवस 'डॉ बाबासाहेब आंबेडकर दिन' म्हणून साजरा केला जाईल असे आदेश न्यूयॉर्कच्या महापौरांनी  दिल्याचं त्यांच्या कार्यालयाने घोषित केलं आहे.

**<><><><><>**

अमेरिका आणि इराण यांच्यातील तेहरान अणू प्रकल्पाबाबतच्या चर्चेची दुसरी फेरी शनिवारी रोममध्ये होण्याची शक्यता आहे. इटलीचे परराष्ट्र व्यवहारमंत्री अंटोनिओ ताजानी  यानी ही बैठक रोममध्ये आयोजित करण्यास रोम तयार असल्याचं काल जाहीर केलं. ताजानी सध्या जपानच्या दौऱ्यावर असून, त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली. अमेरिका आणि इराण यांच्यातील अण्वस्त्राबाबतचा संघर्ष चर्चेनं सुटेल आणि शांतता प्रस्थापित होण्यास मदत मिळेल, असंही ते म्हणाले. या चर्चेसाठी ओमान मध्यस्थाची भूमिका बजावत असून, पहिली फेरी १२ एप्रिल रोजी ओमानमध्ये झाली होती. त्यावेळी दोन्ही देशांनी सकारात्मक आणि ठोस चर्चा झाल्याचं जाहीर केलं होतं. दरम्यान, इराणचे परराष्ट्र व्यवहारमंत्री अब्बास अराघाची याबाबत सल्ला मसलतीसाठी रशियाला जाणार असून, रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्जी लावरोव्ह यांची भेट घेणार आहेत, अशी माहिती इराणच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिली आहे.

**<><><><><>**

हिमाचल प्रदेश आज ७७वा स्थापना दिन साजरा करत आहे. ३० छोट्या छोट्या राजघराण्यांची संसथानं एकत्र करुन 15 एप्रिल 1948 रोजी हिमाचल प्रदेशची स्थापना झाली होती. यावर्षी राज्य स्थापना दिवसाचा मुख्य शासकीय कार्यक्रम चंबा जिल्ह्यात पांगी या डोंगराळ भागातल्या किल्लार या आदिवासी गावात होणार आहे. अशाप्रकारे डोंगराळ आदिवासी पांगी भागात  प्रथमच हा शासकीय कार्यक्रम होत असून मुख्यमंत्री सुखविन्दर सुखू प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी हिमाचल प्रदेशच्या सथापना दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. हिमाचलच्या नागरिकांच्या जीवनात आनंद, समृद्धी आणि आरोग्य असावं अशी शुभकामना त्यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

देशाचा घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर मार्च महिन्यात कमी होऊन २ पूर्णांक ५ शतांश टक्क्यांवर पोहोचला आहे. हा दर फेब्रुवारीत २ पूर्णांक ३८ शतांश टक्के इतका होता. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं आज ही आकडेवारी प्रसिद्ध केली आहे.

**<><><><><>**

यंदाच्या अमरनाथ यात्रेसाठी जम्मू काश्मीरमधे आजपासून नोंदणी सुरु झाली. श्री अमरनाथजी श्राईन बोर्डाच्या संकेतस्थळावरुन नोंदणीला कालच सुरुवात झाली. देशभरातल्या निवडक ५४० बँकशाखांमधेही यात्रेसाठी नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध आहे. यात्रेसाठी नोंदणी करणं अनिवार्य आहे. सर्व यात्रेकरुंना तंदुरुस्तीचं प्रमाणपत्र, आणि इतर कागदपत्रं सादर करावी लागतील. रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेन्टीफिकेशन कार्ड बाळगणं बंधनकारक आहे. प्रतिदिन केवळ १५ हजार यात्रेकरुंना परवानगी असेल. अनंतनाग जिल्ह्यातल्या पहलगाम मार्गे आणि गंदेरबाल जिल्ह्यातल्या बालताल मार्गावरुन यात्रा येत्या ३ जुलै पासून सुरु होईल.

५२ दिवसचालणारी ही यात्रा रक्षाबंधनाच्या दिवशी येत्या ९ ऑगस्टला समाप्त होईल. जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी गेल्या ५ मार्चला यात्रेचा कार्यक्रम जाहीर केला होता.

**<><><><><>**

भारतातून हज यात्रेला जाणाऱ्यांचा कोटा वाढवून आता १ लाख ७५ हजार केला असल्याची माहिती केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्रालयाने दिली आहे. हा कोटा २०१४ पासून १ लाख ३६ हजार यात्रेकरूंचा होता. मंत्रालयाने हाज कमिटीमार्फत १ लाख २२ हजार यात्रेकरूंच्या विमान तिकीटांची आणि इतर व्यवस्था सौदी अरेबियाच्या नियमांप्रमाणे केली असून उरलेल्या यात्रेकरूंची व्यवस्था खाजगी यात्रा कंपन्यांकडे सोपवली असल्याचं मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

डिजिटल अटक प्रकरणात सहभागी असलेल्या चार जणांना सीबीआय ने आज अटक केली आहे. राजस्थानमधल्या  झुंझुनू इथे ४ महिने डिजिटल अटकेत राहिलेल्या पीडित  व्यक्तीच्या तक्रारीवरून सीबीआयने चौकशी सुरु केली होती. त्यासाठी महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि राजस्थानात शोध मोहीम राबवून ही अटक केली आहे. काही सायबर गुन्हेगारांनी या पीडित व्यक्तीला फसवून ७ कोटींहून अधिक रक्कम हडप केली होती. या शोधमोहिमांमध्ये अनेक डेबिट कार्ड्स, चेकबुक आणि डिजिटल उपकरणे सापडली आहेत.

<><><><><>

काँग्रेस नेता प्रियांका गांधी यांचे पती रॉबर्ट वाडरा यांच्या हरियाणातल्या जमीन घोटाळ्यातल्या सहभागाबद्दल सक्तवसुली संचालनालयामार्फत सध्या चौकशी सुरु आहे. वाडरा यांच्या कंपनीने गुरुग्राम इथं केलेल्या जमीन खरेदीचा या खटल्याशी संबंध आहे. नवी दिल्लीतल्या संचालनालयाच्या कार्यालयात वाडरा आज सकाळी चौकशीसाठी हजर झाले होते.

राजस्थानचे माजी मंत्री प्रताप सिंग खचारियावस यांच्या घरासह १५ ठिकाणी आज सक्तवसुली संचालनालयाने छापे टाकले . मेसर्स पी ए सी एल शी संबंधित ४८ हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्याबद्दल सुरु असलेल्या चौकशीसंदर्भात हे छापे टाकले होते. कंपनीची मालमत्ता बेकायदेशीर रित्या विकल्याच्या आरोपावरून दिवंगत निर्मल सिंग भानगू यांच्या सहकाऱ्यांवर  एफआयआर दाखल केले आहेत.

<><><><><>

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या पाचव्या बटालियनने आज महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी आणि आपत्ती प्रतिसाद विषयक सराव आयोजित केले होते. पूर, दरडी कोसळणे, भूकंप तसेच रासायनिक अपघातांना त्वरित प्रतिसाद देऊन कृती करण्याच्या  या सरावात १२ विशेष प्रशिक्षित पथकं

सहभागी झाली होती. येत्या मान्सूनसाठी या पथकांची सज्जता तपासणे हा या सरावांमागचा हेतू होता.

**<><><><>**

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक ग.दि.कुलथे यांचं काल नवी मुंबईतल्या राहत्या घरी हृदयविकाराने  निधन झालं. ते ८७वर्षांचे होते. राज्य शासकीय राजपत्रित अधिकारी संघाचं त्यांनी प्रदीर्घकाळ नेतृत्व केलं. त्यांनी स्थापन केलेली ही संघटना राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी आपापली गाऱ्हाणी मांडण्याकरता उपयुक्त व्यासपीठ ठरलं. सेवानिवृत्तीनंतरही ते संघटनेचे सल्लागार म्हणून कार्यरत होते. त्यांच्या पार्थिवावर नेरुळ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

प्रशासनात पारदर्शकता, संवेदनशीलता, आणि जबाबदारीची भावना रुजवण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. शासकीय अधिकारी- कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचाराला बळी पडू नये, सचोटीने वागावे, यासाठी प्रबोधनावर भर दिला. त्यांच्या नेतृत्वात सुरू झालेली ‘पगारात भागवा’सारखी चळवळ अनोखी ठरली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ग. दि. कुलथे यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><>**

आयपीएल टी २० क्रिकेटमध्ये, आज पंजाब सुपर किंग्ज चा सामना कोलकाता नाईट राईर्डसबरोबर होणार आहे. पंजाबच्या चंदीगढ स्टेडियमवर आज संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल. काल रात्री चेन्नई सुपर किंग्ज ने लखनौ सुपर जायंट्सवर पाच गडी राखून मात करत सामना जिंकला.

**<><><><>**

महाराष्ट्रातल्या संतांनी समाजाला दिलेला संदेश जगात सर्वदूर पोहोचावा, या उद्देशानं पंढरपूर ते लंडन अशी विठुरायाची दिंडी काल रवाना झाली. श्री विठ्ठल-

रुक्मिणी मंदिरात विठ्ठलाच्या प्रतिकात्मक पादुकांची विधिवत पूजा करून दिंडीनं लंडनच्या दिशेनं प्रस्थान ठेवलं. मूळचे अहिल्यानगरचे आणि लंडनमध्ये स्थायिक झालेले अनिल खेडकर यांनी या दिंडीचं आयोजन केलं आहे. ब्रिटनच्या मराठी मंडळाच्या वतीनं लंडनमध्ये विठ्ठल-रुक्मिणी मंदिर उभारण्यात येणार आहे. त्यापूर्वी ही दिंडी २२ देशांमधून १८ हजार किलोमीटरचा प्रवास ७० दिवसांत करून २१ जून रोजी लंडनला पोहोचेल.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातील लखनौ इथल्या लोकबंधू रुग्णालयातल्या बाह्यरुग्ण सेवा आता पूर्ववत सुरु झाल्या असल्याचं रुग्णालय संचालक संगीता  गुप्ता यांनी म्हटलं आहे. रुग्णालयात काल  रात्री लागलेल्या मोठ्या आगीनंतर २०० हुन जास्त रुग्णांना बाहेर काढून जवळच्या बलरामपूर रुग्णालय, के जी एम यु रुग्णालयांत तसंच सरकारी रुग्णालयात हलवण्यात आलं होतं.

**<><><><><>**

केंद्रसरकारच्या वतीने देण्यात येणारे राष्ट्रीय महामार्ग सर्वोत्तम पुरस्कार आज नवी दिल्लीत प्रदान करण्यात येणार आहेत. राष्ट्रीय महामार्ग बांधण्यात तसच त्याची कायम गुणवत्ता राखून देखभाल करताना उत्तम कामगिरी करणाऱ्या व्यावसायिक संस्था आणि व्यक्तींना या पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे . तसच या निमित्ताने दिवसभर विविध चर्चासत्र आणि परिसंवाद आयोजित करण्यात आले असून, त्यात महामार्ग बांधणीत आलेले नवे तंत्रज्ञान, डोंगराळ भागात महामार्ग बांधण्याची आव्हाने तसच जागतिक स्तरावरील महामार्ग बांधणीची गुणवत्ता आणि भारतीय महामार्ग निर्मिती करणाऱ्या कंपन्यांची क्षमता आदी विषयांचा यामध्ये समावेश आहे.

**//<><><><><>//**